मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५०० वा ● बुधवार, ता. २१ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## आठ वर्षांनंतर महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**बेळगाव | श्रीकांत काकतीकर**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी अखेर आठ वर्षांनंतर बुधवार, ता. २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या दिवशी मूळ दाव्यावर सुनावणी होईल. त्याकडे सीमावासीयांचे लक्ष लागून आहे. सीमाप्रश्नी महाराष्ट्राच्या वतीने दावा मेन्शन करण्यात आला होता. वरिष्ठ विधिज्ञ ॲड. सी. एस. वैद्यनाथन आणि ॲड. ऑन रेकॉर्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी निश्चित केली आहे. या दिवशी मूळ दाव्यावरच सुनावणी होण्याची शक्यता आहे. अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. यामध्ये केंद्र सरकार प्रतिवादी क्रमांक एक असून कर्नाटक सरकार प्रतिवादी क्रमांक दोन आहे. सुरुवातीपासूनच दोन्ही प्रतिवादींनी या दाव्यात वेळकाढूपणा केला आहे. २०१३ मध्ये या याचिकेवर साक्षी, पुरावे तपासणे आणि वादाचे मुद्दे निश्चित करण्यासाठी कोर्ट कमिशनची नियुक्ती करण्यात आली. तर न्यायालयात कर्नाटकाने फेरविचार याचिका दाखल करत पुन्हा वेळकाढूपणा केला आहे. २०१७ मध्ये शेवटची सुनावणी झाली होती. त्यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विधिज्ञ ॲड. हरिष साळवे यांनी महाराष्ट्राची बाजू मांडली होती. आगामी सुनावणीलाही त्यांची नियुक्ती करावी, यासाठी मध्यवर्ती समितीतर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. उच्चाधिकार समितीची बैठक व्हावी, यासाठीही पत्रव्यवहार करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन वेळा भेट घेण्यात आली. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष खासदार धैर्यशील माने यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले. पण ही बैठक झाली नाही. दरम्यानच्या काळात वरिष्ठ वकिलांशी समिती नेत्यांचा ऑनलाईन संवाद झाला आहे. आता आठ वर्षांनंतर पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यामुळे सीमावासीयांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.




## खोतीगांव समूह क्रीडा स्पर्धेत श्रीबलराम शाळेची चमकदार कामगिरी

**काणकोण | रयत समाचार**

खोतीगांव शाळा समूहाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेत श्री बलराम प्राथमिक अवे शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले. विविध मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द, मेहनत आणि खेळाडूवृत्ती सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. या स्पर्धेत दिवेश गांवकर याने ५० मीटर धावणे प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. समिका तवडकर हिने ५० मीटर धावण्यात द्वितीय, तर लांब उडी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले. क्रीयांश वेळीप याने चेंडू फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले, तर अंश वेळीप याने याच स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. साहिरा गांवकर हिने चेंडू फ ेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून मुलींच्या गटात शाळेची शान वाढवली. सांघिक खेळांमध्येही शाळेच्या संघांनी उत्तम समन्वय आणि वेग दाखवत मुलींच्या रिले संघाने प्रथम, तसेच मुलांच्या रिले संघानेही प्रथम क्रमांक मिळवून दैदीप्यमान यश संपादन केले. या यशाबद्दल पालक-शिक्षक संघ तसेच शाळेतील शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांचे भरभरून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत कारणीभूत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पुढील काळातही विद्यार्थी अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम ठेवतील, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.



## आगरवाडा येथे गुरुवारी 'संगीत ययाती आणि देवयानी' नाटक

**मोरजी | रयत समाचार**

आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे गणेश जयंतीनिमित्त गुरुवार, ता. २२ जानेवारी रोजी रात्री ९.३० वाजता आखाडा येथील श्री पांडुरंग ब्रह्मेश्वर नाट्य मंडळाचे 'संगीत ययाती आणि देवयानी' हे नाटक सादर करण्यात येणार आहे. वि. वा. शिरवाडकर यांनी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन राजेंद्र नरसिंह फडते यांनी केले असून संगीत दिग्दर्शक प्रसाद गवस व तालरक्षक म्हणून सहदेव माळकर यांनी बाजू सांभाळली आहे. या नाटकात प्रेमानंद कलशावकर (ययाती), ऋतुजा फडते (देवयानी), अशोक नाईक (विदूषक), प्राजक्ता चोडणकर (शर्मिष्ठा), जितेंद्र नरसिंह फडते (यती), हरीश चोडणकर (प्रतिहार), मिलिंद कुलकर्णी, युवराज सावंत, श्रीजीत फडते, हर्ष फडते आणि कचदेवाची भूमिका राजेंद्र नरसिंह फडते साकारणार आहेत. तसेच सौ. तनुजा राजेंद्र फडते (केशरचना), हरीश चोडणकर (पार्श्वसंगीत), जयंत नाटेकर, मापसा (नेपथ्य, प्रकाशयोजना व ध्वनी संकलन) आदी बाजू सांभाळणार आहेत. यावेळी नाट्य कलाकारांचा सत्कार करण्यात येणार असून त्यात कै. दशरथ आत्माराम परब व रामकृष्ण सिताराम परब नागवेकर (मरणोत्तर), सदानंद आगरवाडेकर, मेघनाथ कल्याण नाईक, प्रकाश रामा पोखरे, गोपाळ भाऊ परब, शंखनाथ जयदेव राऊत, वासुदेव बाबलो आगरवाडेकर, लक्ष्मण आत्माराम बगळी यांचा समावेश आहे. आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे गणेश जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी विविध धार्मिक विधी व तीर्थप्रसाद होणार असून त्यानंतर सायंकाळी ४ वाजता मंडळाच्या महिला विभागातर्फे सार्वजनिक हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

# गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच 'गेटवे ऑफ इंडिया' - फडणवीस

## पहिल्याच दिवशी १४.५० लाख कोटींचे १९ सामंजस्य करार

**दावोस | रयत समाचार**

भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच 'गेटवे ऑफ इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट करत दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी रुपयांचे १९ सामंजस्य करार झाल्याचे सांगितले. या गुंतवणुकीमुळे राज्यात सुमारे १५ लाख रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागामार्फत विविध विभाग व विविध उद्योग प्रतिनिधींशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्स, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा आदी क्षेत्रांतील ही गुंतवणूक मुंबईसह रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहोचणार असल्याने उद्योगवाढीसह रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत झाले. "भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार



म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला आणि उद्योगविश्वाला साद घालत आहे," असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सामंजस्य करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा व गुंतवणूकदारांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. करारांवरील पुढील कार्यवाही 'वॉर रूम'च्या माध्यमातून तपासली जाईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने मिळतील, याची काळजी घेतली जाईल." यंदा गतवर्षीपेक्षा अधिक गुंतवणूक व रोजगार संधींचे करार होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, आगामी दोन दिवसांत एआय, क्वांटम कम्प्युटिंग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, फिनटेक, लॉजिस्टिक्स-अँड-इन्फ्रास्ट्रक्चर, जहाज बांधणी, ईव्ही व अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील उद्योगांशी आणखी सामंजस्य करार होण्याची शक्यता असून त्यासाठी चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानुसार स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI) या व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदारांचा महाराष्ट्राकडे ओघ वाढल्याचेही नमूद करण्यात आले. या करारांमध्ये महाराष्ट्र सरकार-कार्लसबर्ग (५०० कोटी, ७५० रोजगार), महाराष्ट्र सरकार-योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. (४ हजार कोटी, ६ हजार रोजगार, पालघर/एमएमआर), महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स (५६५ कोटी, ८४७ रोजगार, पालघर/एमएमआर), तसेच एमएमआरडीए अंतर्गत सुमिटोमो रियालिटी, के. रहेजा, अल्टा कॅपिटल/पंचशील, एसबीजी समूह, आयआयएसएम ग्लोबल यांच्याशी गुंतवणूक व रोजगार करारांचा समावेश आहे. याशिवाय एमएमआरडीए-जायका धोरण व स्ट्रॅटेजी पार्टनर, एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेव्हलपमेंट लि. सिंगापूर एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर आणि एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच (जर्मनी) शाश्वत नागरी वाहतूक प्रणालीसाठी भागीदारी करार करण्यात आले. महाराष्ट्र सरकार-सुरजागड इस्पात (२० हजार कोटी, ८ हजार रोजगार, गडचिरोली) आणि महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स (१ लाख कोटी, १ लाख ५० हजार रोजगार) अशा करारांचाही यात समावेश आहे. यावेळी कोकाकोला, आयकिया व स्कोडा ऑटो यांनी महाराष्ट्रात विस्तार व अधिक गुंतवणुकीची तयारी दर्शविल्याचे सांगण्यात आले. कार्लसबर्गचे सीईओ जेकब अँडरसन यांनी महाराष्ट्रातील गुंतवणुकीला पोषक वातावरणाचे कौतुक करत राज्याच्या उद्योगधोरणाला दाद दिली. तसेच कोका-कोला कंपनीचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट मायकेल गोल्टझमन यांच्यासोबतही मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुंतवणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली.

# कर्नाटकमध्ये महापालिका निवडणुका पुन्हा बॅलेट पेपरवर

## ईव्हीएम ऐवजी पारंपारिक पध्दत; मे २०२६ पासून अंमलबजावणी

**बेंगळुरु | रयत समाचार**

कर्नाटक राज्यात मे २०२६ मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हिएम ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. कर्नाटक राज्य निवडणूक आयोग यांनी हा निर्णय जाहीर केला असून, बेंगळुरु प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पाच महानगरपालिकांच्या निवडणुका २५ मे २०२६ नंतर पार पडणार आहेत. बेंगळुरुचे मुख्य निवडणूक अधिकारी जी.एस. संगरेशी यांनी सांगितले की, या निवडणुकांमध्ये मतपेटी आणि बॅलेट पेपर या पारंपरिक पद्धतीचा वापर केला जाईल. यासोबतच, या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या जिल्हा व तालुका पंचायत निवडणुकाही बॅलेट पेपरवरच घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयावर सर्वोच्च न्यायालय यांनी कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला न्यायालयीन मान्यता मिळाल्याचे मानले जात आहे. राजकीय पातळीवर या निर्णयावर प्रतिक्रिया उमटत आहेत.

उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी, "निवडणूक आयोगाच्या निर्णयांमध्ये सरकार कोणताही हस्तक्षेप करणार नाही," अशी भूमिका मांडली. दरम्यान, भाजपने या निर्णयावरून काँग्रेस वर टीका केली आहे. स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळापासून ईव्हीएमची पद्धत राबवली जात असताना, आता खासदार राहुल गांधी यांना खूष करण्यासाठी बॅलेट पेपरचा निर्णय घेतल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे. एकूणच, कर्नाटकातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पारंपरिक मतदान पद्धतीकडे परतफिरण्याचा निर्णय हा देशभरात चर्चेचा विषय ठरत असून, याचे राजकीय व प्रशासकीय परिणाम पुढील काळात दिसून येणार आहेत.

## शिर्डी साई संस्थानाचे कायदेशीर सल्लागार ॲड. नितीन गवारे-पाटील यांची एनआयए विशेष सरकारी वकीलपदी नियुक्ती

**नवी दिल्ली | रयत समाचार**

कायदा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणारे प्रख्यात विधिज्ञ व शिर्डी साई संस्थानाचे कायदेशीर सल्लागार ॲड. नितीन गवारेपाटील यांची मुंबई उच्च न्यायालयात राष्ट्रीय तपास संस्था (NIA) विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, त्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.

ॲड. गवारे-पाटील हे मुळचे अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांनी यापूर्वी विविध संवेदनशील व महत्त्वाच्या प्रकरणांत प्रभावी युक्तिवाद करून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा न्यायालयीन अनुभव, कायद्यावरील सखोल अभ्यास आणि




प्रकरणांच्या बारकाव्यांवरील पकड लक्षात घेऊनच ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली असल्याचे कायदा क्षेत्रातून सांगण्यात येत आहे. या नियुक्तीमुळे शिर्डी साई संस्थानासह राज्यातील कायदा क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून ॲड. नितीन गवारे-पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे राज्यातील तरुण विधिज्ञांना निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# जगातील सर्वोच्च शिक्षण आईकडून मिळते- डॉ.भागवत

**राजेंद्र देवढे | रयत समाचार**

मराठी शाळेत शिक्षण घेत असताना, पहिल्या इयत्तेत माझी आईच वर्गशिक्षिका होती. जिला परिषद शाळेत झालेल्या प्राथमिक शिक्षणातून शिस्त व संस्कार मिळाले. आई शिक्षिका व वडीलही शिक्षक असल्याने घरातूनच शिक्षणाचे महत्त्व रुजले. तेलंगाना राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक तथा पाथर्डीचे भूमिपुत्र डॉ. महेश भागवत यांनी आपल्या जीवनप्रवासाचा वेध घेताना सांगितले की, जगातील सर्वोच्च शिक्षण आईकडूनच मिळते.

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पाथर्डी येथील बर्ड संस्थेतर्फे माधवराव निराळी खुले नाट्यगृह येथे डॉ. भागवत यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली होती. स्नेहालयच्या सचिव तथा प्रख्यात माध्यमतज्ज्ञ डॉ. प्रीती मोहन ठोंबे यांनी त्यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी, आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड. श्याम असावा, केदारेश्वर कारखान्याचे अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे, कौशल्या ढाकणे, बर्ड संस्थेचे डॉ. दीपक देशमुख व डॉ. मृत्युंजय गर्जे यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



डॉ. प्रीती यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देताना, डॉ. भागवत पुढे म्हणाले, अभियांत्रिकी शिक्षणानंतर सामाजिक चळवळींशी संबंध आला. डॉ. नरेंद्र दाभोळकर, मेधा पाटकर व अण्णा हजारे यांच्या सहवासाने सामाजिक बांधिलकी दृढ झाली. १९९५ मध्ये आयपीएस सेवेत प्रवेश केल्यानंतर देशभर काम करण्याची संधी मिळाली. मुंबईतील प्रशिक्षण काळात रमेश तेंडुलकर यांचे मार्गदर्शन लाभले, तर रतन टाटा यांचा सहवास आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. अधिकार मिरवण्यासाठी नव्हे तर ते लोकसेवेचे व्रत करण्यासाठी प्रभावी माध्यम असते. परिश्रमाला पर्याय नाही; शॉर्टकटने यश मिळत नाही. मणिपूरमध्ये काम करताना स्थानिक भाषा शिकून लोकांमध्ये मिसळून काम केले. आंध्र प्रदेशात पोलीस तुमच्यासाठी हा अभिनव उपक्रम राबवून नक्षलवादाकडे वळलेल्या तरुणांना मुख्य प्रवाहात आणले. एका माजी नक्षलवाद्याला विद्यापीठात प्रवेश मिळवून देत त्याला प्राध्यापक बनविण्यापर्यंतचा प्रवास घडवून आणला.

मानवी तस्करीविरोधात मोठी कारवाई करत देशभरातून सुमारे १,५०० महिलांची सुटका केली. रेड लाईट एरियातील मुला-मुलींसाठी शिक्षण व निवासाची व्यवस्था उभी केली. तसेच वीटभट्ट्यांवरील ५,५०० मुलांना शाळेत आणून शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेतले. या कामाची दखल संयुक्त राष्ट्र संघाने घेतली असून २०१७ मध्ये अमेरिकन सरकारचा पुरस्कार मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. नक्षलग्रस्त भागात श्रमदानातून रस्ते उभारणी, शिक्षण सुविधा निर्माण करणे आणि ग्रामस्थांचा विश्वास जिंकणे यामुळे परिस्थिती बदलल्याचे त्यांनी सांगितले. हैदराबाद विमानतळावर राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याशी झालेली १५ मिनिटांची चर्चा ही त्यांच्या कारकिर्दीतील अविस्मरणीय क्षण असल्याचे ते म्हणाले. स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना ते नियमित ऑनलाइन मार्गदर्शन करतात.

नवी पिढी परिश्रमशील, नीतिमान व राष्ट्रप्रेमी असावी; कुठलाही शॉर्टकट टिकत नाही, असे आवाहन त्यांनी शेवटी केले. डॉ. दीपक देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सुखदेव मर्दाने यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. मृत्युंजय गर्जे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, भाजपाच्या महिला शहराध्यक्ष ज्योती शर्मा, डॉ. शारदा गर्जे, प्रा. अनिता पावसे, प्रा. संगीता फुंदे, प्रा. रमेश मोरगावकर, डॉ. विनय फड, उद्योजक भारत सातपुते, बाळासाहेब जिरेसाळ, श्रीकांत जाजू, दिलीप पुंड, जगदीश डागा, दिनेश येळाई, रावसाहेब मगर, आनंद फासे, रामकृष्ण सरोदे, यांच्यासह शहरातील विविध स्तरांतील नागरिक व तरुण-तरुणी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विविध संस्था व नागरिकांनी भागवत यांचा सत्कार केला.

# फिटनेस प्रक्रिया बंद, वाहनधारक अडचणीत

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर येथील एमएच.१६ प्रादेशिक परिवहन कार्यालयात लक्झरी बस, स्कूल बस व इतर व्यावसायिक वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया ३ जानेवारी २०२६ पासून बंद असल्याने जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था धोक्यात आली आहे. अहमदनगर बस ओनर्स अँड ट्रॅव्हल्स असोसिएशनने प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवेदन देऊन फिटनेस प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. अहिल्यानगर आरटीओ कार्यालयात १०,८५,५६३ वाहनांची नोंदणी असून त्यापैकी ९,३०,२३७ खासगी वाहने आहेत. खासगी वाहनांना १५ वर्षांसाठी फिटनेस दिला जातो. मात्र



१,५५,३२६ व्यावसायिक वाहने (लक्झरी बस, स्कूल बस, एसटी, रिक्षा, ट्रक, टँकर व इतर मालवाहतूक) यांना मोटार वाहन कायदा १९८८ कलम ६२(१) नुसार दरवर्षी फिटनेस बंधनकारक आहे. फिटनेस नसलेल्या वाहनांना रस्त्यावर चालवणे कायद्याने मनाई आहे. आरटीओकडून नवीन एटीएस (Automated Testing Station) मशीन सुरू झाल्यानंतरच प्रक्रिया सुरू होईल व त्यासाठी सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागेल, असे सांगण्यात आले. सध्या दरमहा सुमारे १५०० वाहनांचे फिटनेस होतात. त्यामुळे पुढील सहा महिन्यांत ९ हजारांहून अधिक वाहने उभी राहतील किंवा विना फिटनेस धावतील, अशी स्थिती होऊ शकते. अहिल्यानगर आरटीओ हद्दीत ८१२ स्कूल बसेस, १२१६ लक्झरी बसेस, १५० एमआयडीसी कामगार वाहतूक बसेस व ८३६६ ऑटोरिक्षा आहेत. तसेच दररोज ५०० भाजीपाला वाहने, ३५० दूध टँकर, ७६० पेट्रोलियम टँकर व ४०० घरगुती गॅस वाहने जिल्ह्यातून प्रवास करतात. फिटनेस बंद राहिल्यास शाळा, प्रवासी वाहतूक, कामगार वाहतूक व अत्यावश्यक मालवाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. फिटनेसअभावी वाहने उभी राहिल्यास वाहनमालक, चालक, फिटर, वायरमन यांचा उदरनिर्वाह धोक्यात येईल. तसेच विना फिटनेस वाहनांचा अपघात झाल्यास विमा संरक्षण मिळणार नाही, दंड किंवा वाहन जप्तीची कारवाई होऊ शकते. फिटनेस तातडीने सुरू न केल्यास व अनुचित घटना घडल्यास जबाबदारी आरटीओ विभागाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी अध्यक्ष नावेद शेख, सचिव रमेश बोसले, रवी जोशी, जयकुमार बोगावत, अल्ताफ सय्यद, निखिल जाधवर, अरुण गांगर्डे, अनिल काशीद, दिलीप कुलकर्णी, विवेक सूर्यवंशी, अमित लोणकर, आकाश बंधुले, भूषण तळेकर, वसीम शेख, फिरोज शेख, नजर खान, प्रवीण बटावणेकर, दिनेश चौरे, हनुमान दारकुंडे, विकास दळवी, रमेश खेडकर, गणेश राजनी, सुरज लोंढे, विशू डोळे, बालम पठाण, सुनील गडाख, इमरान खान, अमोल गायकवाड, स्वप्निल जबे, राहुल कारखेले, मारुती आव्हाड, हेमंत निवासकर, मनोज बोरुडे, हरिभाऊ आव्हाड, रामकिसन गीते, सुभाष मुळे, संगीता काळे, बन्सी बाळे आदींसह वाहन चालक व मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत गार्गी चव्हाणला सांघिक सुवर्ण पदक

**अहमदनगर । रयत समाचार**



इंफाळ (मणिपूर) येथे सुरू असलेल्या १९ वर्षाखालील शालेय राष्ट्रीय धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगरची स्टार खेळाडू गार्गी रुपेश चव्हाण हिने रिकर्व्ह राऊंड प्रकारात सांघिक कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावले आहे. अमरावती येथे डिसेंबरमध्ये झालेल्या शालेय राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत गार्गी चव्हाण हिने १ कांस्य व १ रजत पदक मिळवले होते. ही स्पर्धा क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय तसेच महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली होती. त्यातून तिची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली होती. नगरची रहिवासी व सध्या इ. १२ वीमध्ये दादासाहेब घाडगे पाटील विद्यालय येथे शिक्षण घेत असलेली गार्गी चव्हाण महाराष्ट्र संघातून राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी असून तिने सांघिक सुवर्ण पदक पटकावले आहे. लहानपणापासून तिला क्रीडा क्षेत्राची आवड असून आजपर्यंत तिला अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदके मिळाली आहेत. तसेच राज्य मिनी ऑलंपिकमध्येही तिने सुवर्ण पदक मिळवले आहे. तिला नगरचे अभिजित व शुभांगी दळवी यांच्याकडे प्रशिक्षण मिळत असून त्यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



## राष्ट्रीय लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती जिल्हाध्यक्षपदी नाना डोंगरे

**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रीय लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती (महाराष्ट्र राज्य) यांच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निमगाव वाघा (ता. नगर) येथे पार पडलेल्या चौथ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात संस्थापक अध्यक्ष संदीप बोरकर यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. या प्रसंगी वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक व राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर तसेच प्रसिद्ध अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला कवयित्री सरोज आल्हाट, साहित्यिक सुभाष सोनवणे, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे सचिव अ‍ॅड. राजेश कावरे, राष्ट्रीय लोककलावंतचे संस्थापक अध्यक्ष संदीपकुमार बोरकर, सरपंच उज्वलाताई कापसे, संदिप रासकर, कवी संमेलनाध्यक्ष आत्माराम शेवाळे, ज्येष्ठ कवी आनंदा साळवे, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष संदीप कुमार बोरकर यांनी सांगितले की, लोककलावंतांची समृद्ध संस्कृती हळूहळू लोप पावत असून पारंपरिक लोककला, लोकसंगीत, लोकनाट्य यांना संरक्षण व प्रोत्साहन देण्याची गरज आहे. दिव्यांग व निराधार घटकांना आधार देण्यासाठी संघटना राज्यभर कार्यरत आहे. पै. नाना डोंगरे हे गेल्या अनेक वर्षांपासून लोककलावंत, दिव्यांग व निराधारांसाठी सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून काम करत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊनच जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी जिल्हा कार्यकारिणीची घोषणाही करण्यात आली. पै. नाना डोंगरे म्हणाले की, लोककलावंत ही ग्रामीण संस्कृतीची खरी ओळख असून त्यांच्या कलेतून समाजजागृती व परंपरेचे जतन होते. मात्र बदलत्या काळात लोककलावंत उपेक्षित राहिले आहेत. त्यांना न्याय, सन्मान व हक्क मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून कार्य केले जाईल. दिव्यांग व निराधार बांधवांना सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात अनेक अडचणी येतात. शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे, हक्काचे लाभ मिळवून देणे आणि गरज पडल्यास न्यायासाठी रस्त्यावर उतरून लढा देणे, हे प्रमुख उद्दिष्ट असेल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संघटनेची मजबूत बांधणी करून लोककलावंत, दिव्यांग व निराधारांचा सशक्त आवाज निर्माण केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या निवडीबद्दल डोंगरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त

## जिल्हा वाचनालयात पुस्तक रसग्रहण व चारोळी लेखन स्पर्धांचे आयोजन




**अहिल्यानगर । रयत समाचार**

मराठी भाषेचा वापर अधिकाधिक वाढावा व तिचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दरवर्षी १४ ते २८ जानेवारी दरम्यान साजरा केला जातो. या निमित्ताने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने पुस्तक रसग्रहण व चारोळी लेखन अशा दोन साहित्यिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली. या दोन्ही स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन आणि खुला अशा तीन गटांमध्ये होणार आहेत.

पुस्तक रसग्रहण स्पर्धेसाठी स्पर्धकांनी वाचलेल्या व आवडलेल्या पुस्तकाचे ७०० शब्दांपर्यंत रसग्रहण सादर करायचे आहे. तर चारोळी लेखन स्पर्धेत प्रत्येक स्पर्धकाला चार चारोळ्या पाठवता येतील. एकाच स्पर्धकाला दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार असल्याची माहिती वाचनालयाच्या संचालिका शिल्पा रसाळ व प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी दिली. स्पर्धकांनी आपले साहित्य ३१ जानेवारी २०२६ पर्यंत अहिल्यानगर जिल्हावाचनालय, ३७५०, चितळेरोड, नेतासुभाषचौक, अहिल्यानगर या पत्त्यावर प्रत्यक्ष आणून द्यावे किंवा पाठवावे, असे आवाहन सांस्कृतिक समिती प्रमुख किरण आगरवाल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ग्रंथपाल अमोल इथापे ९५९५६६६७७०, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल ८१४९१०६३३८, निर्गम सहायक पल्लवी कुक्कडवाल ९३५६३७२४३९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन खजिनदार तन्वीर खान, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई तसेच सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर यांनी केले आहे. मराठी साहित्यप्रेमींना सर्जनशीलतेला वाव देणारी ही स्पर्धा नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.



## आनंद पार्श्व गुरुकुलमध्ये मकर संक्रांती उत्साहात साजरी

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' हा संदेश देत तसेच शाळेच्या नवीन इमारतीला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आनंद नवकार परिवार ट्रस्ट संचलित श्री आनंद पार्श्व गुरुकुल, अहिल्यानगर (केडगाव) येथे काल ता. १९ जानेवारी २०२६ रोजी मकर संक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या कमिटी मेंबर मेघा बोरा यांनी सरस्वती पूजन करून केली. प्राचार्या कादंबरी सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मकर संक्रांतीचे धार्मिक व वैज्ञानिक महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी व पालकांनी पारंपारिक वेशभूषेसह कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी महिला पालक वर्गांचा हळदी-कुंकू, उखाणे व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकमेकांना व शिक्षकांना तिळगुळ देऊन ''तिळगुळ घ्या, गोड गोड बोला'' असा शुभेच्छा संदेश दिला. काही विद्यार्थ्यांनी संक्रांतीची गाणी तसेच माहिती देणारी भाषणे सादर केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दलची ओढ निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योग विशेषतज्ञ अभिजीत शहा यांनी योग, आहार तसेच पालक-विद्यार्थ्यांमधील संबंध, आत्मविश्वास व पालकांच्या अपेक्षा याविषयी मार्मिक मार्गदर्शन केले.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मीना संजय चोपडा व अनिता विपुल शेटिया उपस्थित होत्या. गुरुकुलच्या सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्कार, शिक्षा व सेवा यांचा त्रिवेणी संगम असणाऱ्या अहिल्यानगरमधील एकमेव श्री आनंद पार्श्व गुरुकुल, सोनेवाडी रोड, अहमदनगर येथे आगामी २०२६-२७ या वर्षासाठी प्ले ग्रुप ते दहावीपर्यंत विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरू झाला आहे. अधिक माहितीसाठी मेघा बोरा (९९२२२०२३५२) व कादंबरी सूर्यवंशी (८०८७८३९४३१) यांच्याशी संपर्क साधावा.

## 'नगारा' संगीत महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

### पं. नागेश आडगावकर यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध



**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात आयोजित 'नगारा' संगीत महोत्सवाला महाराष्ट्रभरातून कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सोमवारी ता. १९ जानेवारी रोजी राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा व राज्यस्तरीय अभंग गायन स्पर्धा (वैयक्तिक) पार पडल्या. अभंग गायन स्पर्धेत रूपक कुलकर्णी (पुणे) याने प्रथम, श्रेया गाढवे (पुणे) द्वितीय, शाल्मली भालेराव (अहिल्यानगर) तृतीय, दामिनी देवढे (छ. संभाजीनगर) उत्तेजनार्थ, गौरी इंगळे (अहिल्यानगर) विशेष पारितोषिक मिळविले. देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत परिक्रमा पब्लिक स्कूल (काष्टी, श्रीगोंदा) प्रथम, दि. आयकॉन पब्लिक स्कूल (नगर) द्वितीय, अनामप्रेम संस्था (अहिल्यानगर) तृतीय, विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (माहिजळगाव) उत्तेजनार्थ, जि.प. प्राथमिक शाळा गोंडेगाव (श्रीरामपूर) विशेष पारितोषिक विजेते ठरले. पारितोषिक वितरण समारंभास संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे अध्यक्षस्थानी होते. खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, सदस्या निमाताई काटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, संचालक डॉ. बी.एच. झावरे उपस्थित होते. परीक्षण डॉ. नीरज करंदीकर, वर्षा पंडित, शुभांगी मांडे, हर्षद भावे यांनी केले.

सायंकाळी ६ वाजता पं. नागेश आडगावकर यांची मैफल झाली. त्यांनी 'राग नंद', किरवाणीतील ''क्या जादू डारा दिवाना'' ठुमरी तसेच ''घेई घेई माझे वाचे'', ''समयासी सादर व्हावे'', ''आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा'' हे अभंग सादर केले. तबल्यावर रोहन पंढरपूरकर, संवादिनीवर स्वानंद कुलकर्णी, पखवाजवर रोहित खवळे, व्हायोलीनवर संजुक्ता फुकान, स्वरसाथ प्रफुल्ल सोनकांबळे व प्रा. योगेश अनारसे यांनी साथसंगत केली. सूत्रसंचालन प्रा. ढोकणे यांनी केले. आभार प्रा. आदेश चव्हाण यांनी मानले. आयोजनासाठी डॉ. संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे, प्रबंधक बबन साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. आदेश चव्हाण, प्रा. अभिजीत अपस्तंभ, प्रा. योगेश अनारसे, प्रा. कल्याण मुरकुटे, समिती सदस्य व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक










**हॉटेल भाड्याने देणे**

नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.

- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# कालभैरवनाथ तीर्थक्षेत्र बहिरवाडी रस्त्याचे भूमिपूजन

**नेवासा । विजय खंडागळे**

नेवासा बुद्रुक ते बहिरवाडी, बहिरवाडी ते भालगाव या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ देवगड संस्थानचे उत्तराधिकारी हभप प्रकाशानंद गिरी यांच्या हस्ते आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंग घुले, ॲड. अनिल मारकळी, प्रभाकर बोरकर, अनिल बोरकर, हभप विजय पवार, हभप रामनाथ पवार, हभप लक्ष्मण नांगरे, अशोक कोलते, सिताराम घोरपडे, बाबासाहेब वाखुरे, नंदकुमार वाखुरे, सुनील हारदे, अशोक नांगरे, ज्ञानेश्वर पेचे, भाऊसाहेब वाघ, प्रताप चिंधे, राजेंद्र मते, भारती बेद्रे, आनंद नांगरे आदी उपस्थित होते. यावेळी गिरी महाराज म्हणाले की, रस्त्याचे काम सुरू होणे ही कालभैरवनाथ भक्तांसाठी




आनंदाची बाब आहे. गुरुवर्य भास्करगिरी बाबांनीही हे काम मार्गी लागणे गरजेचे असल्याचे सांगितले होते. अनेक वर्षांपासून अडथळे येत होते, मात्र भैरवनाथांच्या कृपेने यंदा हे काम सुरू झाले. देवस्थानचा विकास दळणवळणावर अवलंबून असल्याने रस्ते चांगले असणे आवश्यक आहे. या रस्त्यासाठी सहकार्य करणाऱ्यांचे त्यांनी आभार मानले. मजबूत रस्ता व्हावा आणि काम झाल्यानंतर पुन्हा खड्डे पडू नयेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिराकडे जाणारा रस्ता रखडला होता, तो आज सुरू होत आहे. हे काम व्हावे ही

**रस्त्याच्या कामासाठी सहकार्य करणाऱ्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना कालभैरवनाथ व नाथभक्त निश्चितच भरभरून आशीर्वाद देतील.**
**– हभप प्रकाशानंद गिरी**

बाबांची इच्छा होती. तालुका साधुसंतांच्या पदस्पर्शाने पुनीत असून देवस्थानाला

**अनेक दिवसांपासून निधीच्या प्रतीक्षेत असलेली सर्व प्रलंबित कामे प्रथमदर्शनी मार्गी लावणार. लवकरच श्री क्षेत्र देवगड प्रवरा नदीवरील तेरा गावांना जोडणाऱ्या २.५ कोटींच्या पादचारी पुलाचे भूमिपूजन करणार.**
**– विठ्ठलराव लंघे,** आमदार

दळणवळणाची सुविधा झाल्यास भाविकांचा ओघ वाढेल. यावेळी बाळासाहेब मारकळी, मनोज बोरकर, संजय मारकळी, रवींद्र मारकळी, राजेंद्र मुरूमकर, दादासाहेब उदागे, भास्कर मिटकरे, बाबासाहेब वाखुरे, दुर्योधन भोंगळ यांच्यासह बहिरवाडी, धामोरी, नेवासा बुद्रुक, भालगाव, उस्थळ व खालच्या परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळते– सरपंच गजभार

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर येथील राजा शिवछत्रपती विद्या प्रसारक मंडळाचे कौठा येथील राजे संभाजी माध्यमिक विद्यालयात बाल आनंद मेळावा संपन्न झाला. बाल आनंद मेळाव्यातून मुलांना व्यवहारिक ज्ञान मिळते, असे प्रतिपादन लोकनियुक्त सरपंच प्रमोद गजभार यांनी केले. या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच कडूभाऊ मोहीते, रावसाहेब शेळके, मच्छिंद्र डाके उपस्थित होते. चिमुकल्या मुलांनी बाल आनंद मेळाव्यात उत्स्फूर्त प्रतिसाद घेतला. पालकांनीही आपल्या पाल्याला व्यवसायिक किती ज्ञान आहे याची परिक्षा घेण्याचा प्रयत्न केला. शिक्षकांसह ग्रामस्थांनी विविध स्टॉलला भेटी देऊन तेथील पदार्थांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक उद्धवराव सोनवणे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व व्यवहारिक ज्ञान मिळावे यासाठी बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात येतो. पालकही आपल्या पाल्यांना सहभागी होण्यासाठी मदत करतात. याप्रसंगी चेअरमन रावसाहेब शेळके म्हणाले की, ''शिक्षण घेणे म्हणजे नुसत्या पदव्या मिळवणे नव्हे तर ती एक जीवन जगण्याची उत्कृष्ट कला आहे. बालकांना जर बाल वयातच व्यवहारिक कौशल्य प्राप्त झाले तर ते भविष्यात निश्चितच मोठे उद्योगपती बनून आदर्श नागरिक बनतील व आपल्या गावाचं नाव मोठं करू शकतील, असा मला आत्मविश्वास वाटतो.'' या बाल आनंद मेळाव्यात ४५,७८० रुपयांची उलाढाल झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत भाजीपाला, पाणीपुरी, भेळ, भजे, वडापाव, गुलाबजामून, फिंगरचिप्स असे विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. बाल आनंद मेळावा यशस्वीतेसाठी भाऊसाहेब जाधव, सुधाकर आवारे, अंकुश आघाव, सतीष उदमले, राहुल शिरसाठ, अंबादास मिसाळ, माधवी जोशी, ज्योती शिंदे, बाळासाहेब जाधव, विजय दानवे, अशोक गायकवाड हे प्रयत्नशील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र केकाण यांनी केले तर बापूसाहेब काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गोरक्षनाथ गडावर धर्मनाथ बीज उत्साहात

**नगर तालुका । रयत समाचार**

गोरक्षनाथ गड मांजरसुंबा परिसर येथे मंगळवार ता. २० रोजी नाथ संप्रदायातील महत्त्वाचा उत्सव असलेला धर्मनाथ बीज मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. हा उत्सव माघ शुद्ध द्वितीयेला साजरा केला जातो. याच दिवशी गुरु गोरक्षनाथांनी शिष्य धर्मनाथ यांना दीक्षा प्रदान केली होती, अशी परंपरा आहे.

सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत महापूजा व अभिषेक विधी पार पडला. त्यानंतर हभप संतोष वनवे (बीड) यांचे जाहीर हरिकीर्तन झाले. संत निळोबाराय यांचा अभंग ''भाविकांचे आवडी देवा



करी सेवानिज प्रीती'' या अभंगावर उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करण्यात आले. कीर्तनादरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले. ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव कदम यांनी उपस्थित भाविकांचे स्वागत केले. यावेळी हभप ईश्वर कदम, हभप ऋषिकेश फटांगरे, हभप ऋषिकेश शेटे, सरपंच जालिंदर कदम, ट्रस्टचे उपाध्यक्ष जयराम कदम, मारुती कदम, राधाकिसन भुतकर, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारनेर तालुक्यातील सिद्धेश्वरवाडी येथील भाविकांनी पायी दिंडी सोहळा आयोजित करून कार्यक्रमात सहभाग घेतला. समारोपानंतर सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. दिवसभर गडावर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. हा उत्सव नाथ संप्रदायातील भक्ती, दीक्षा व अन्नदानाच्या परंपरेचे प्रतीक आहे.

# नऊ वर्षानंतर मिळाले विषय समित्यांचे सभापती

## सर्वांची बिनविरोध निवड

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार काल श्रीरामपूर नगरपालिकेच्या विविध विषय समित्यांच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे मागील पंचवार्षिकमध्ये एकाही वर्षी विषय समित्यांच्या सभापतींची निवड होऊ शकली नव्हती. राज्यातील ते एकमेव उदाहरण होते. त्यानंतर प्रशासकीय काळाची चार वर्षे पाहता नऊ वर्षांनंतर पालिकेच्या विविध समित्यांना सभापती मिळाले आहेत.

काल सकाळी विषय समित्यांच्या सभापती पदासाठी अर्ज दाखल केल्यानंतर दुपारी दोन वाजता प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विषय समित्यांच्या सभापतींची निवड घोषित करण्यात आली. सर्व निवडी बिनविरोध



झाल्या. तत्पूर्वी रविवारी सायंकाळी काँग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवकांची बैठक होऊन संपूर्ण पाच वर्षांमध्ये प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न असून प्रत्येकाला संधी मिळेल.

त्यामुळे कोणीही मागणी न करता व नाराज न होता एकोप्याने निवडी कराव्यात, असे पक्षातर्फे सर्व नगरसेवकांना सांगण्यात आले. त्या सर्वांनी होकार दिला. उपनगराध्यक्षपदावर सहा–सहा महिन्यांची संधी दिली जाणार आहे.

सदरच्या निवडी करताना आमदार हेमंत ओगले, अध्यक्ष करण ससाने, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, नगरपालिकेतील गटनेते मुजफ्फर शेख आदींनी सर्वांशी विचारविनिमय करून नावे अंतिम केली.



# मुरलीधर खटोड यांचे राजकीय, सामाजिक कार्य प्रेरणादायी– पालकमंत्री विखे

## विखे यांची कर्मयोगी खटोड पतसंस्थेला भेट

**बेलापूर । शफीक बागवान**

दिवंगत सरपंच कर्मयोगी मुरलीधर खटोड यांचे राजकीय व सामाजिक कार्य पुढील पिढ्यांना प्रेरणादायी आहे असे गौरवोदगार राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी काढले. बेलापूर येथे कार्यक्रमानिमित्त आले असता त्यांनी येथील कर्मयोगी मुरलीधर खटोड जनलक्ष्मी पतसंस्थेला आवर्जुन सदिच्छा भेट देऊन खटोड यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.

त्यावेळी अनौपचारिक गप्पांमध्ये विखे यांनी कर्मयोगी मुरलीधर खटोड यांच्या स्मृतिना उजाळा देऊन पतसंस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. पतसंस्थेचे चेअरमन व जिल्हा भाजपा कार्यकारिणी सदस्य रविंद्र खटोड, भरत साळुंके यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकनाना साळुंके, उपाध्यक्ष राजेश खटोड, सचिव ॲड. शरद सोमाणी, सहसचिव दिपक सिकची, विश्वस्त बापूसाहेब पुजारी, नंदुरशेठ खटोड, संस्थेचे संचालक सर्वश्री व्हा. चेअरमन प्रिया चंगेडिया दिवाकर कोळसे, अरविंद शहाणे,भरत साळुंके, अभिजित राका,रमाकांत खटोड, आनंद दायमा, विशाल मेहेत्रे, शेखर डावरे, प्रमोद बिहाणी, विलास सोनवणे, सौ. उषा सोनवणे, व्यवस्थापक संजय नागले, शाखाधिकारी श्रीकांत कोटकर,भरत शिंदे, वैभव कडू यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद,खातेदार, सेवकवृंद व ग्रामस्थ उपस्थित होते. गावात आगमन होताच ना. विखे यांनी ध्वजस्तंभ चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालुन अभिवादन केले.संयोजकांच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोलताशाच्या गजरात ना. विखेंचे गावात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.



# नगरपरिषदेच्या विशेष समित्यांचे सभापती जाहीर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

नगरपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या सुनिता संतोष खेतमाळीस या नगराध्यक्षपदी निवडून आल्या असून उपनगराध्यक्षपदी भाजपच्या अलका सुनील दरेकर यांची बहुमताने निवड झाली आहे.

नगराध्यक्षा सुनिता संतोष खेतमाळीस यांनी नगरपरिषदेतील विविध विशेष समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. त्यानुसार महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी भाजपच्या मिरा नितिन शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. बांधकाम समिती सभापतीपदी कोमल विकास बोरुडे, आरोग्य समिती सभापतीपदी प्रशांत मिठू गोरे, तर पाणीपुरवठा समिती सभापतीपदी शहाजी तुकाराम खेतमाळीस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षण, कला व सांस्कृतिक समिती सभापतीपदी शिवसेनेचे सुशिलकुमार शिंदे यांची निवड झाली असून महिला व बालकल्याण समिती उपसभापतीपदी शिवसेनेच्या दिपाली नंदकुमार बोरुडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व नियुक्त्यांमुळे नगरपरिषदेच्या विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास नगराध्यक्षा सुनिता संतोष खेतमाळीस यांनी व्यक्त केला आहे.

# उखलगावात पोलिस व सैन्य भरती प्रशिक्षण वर्ग सुरु

## आजी–माजी सैनिकांच्या मार्गदर्शनास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजना अंतर्गत उखलगाव येथे आजीमाजी सैनिक संघटनेच्या मार्गदर्शनाखाली पोलिस व सैन्य भरती प्रशिक्षण वर्गास सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाला गावातील तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. या प्रशिक्षण वर्गामध्ये शिस्त, मेहनत, शारीरिक तंदुरुस्ती, कवायत तसेच मानसिक तयारी यावर विशेष भर देण्यात येत आहे. नियमित सरावामुळे तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढत असून, पोलिस व सैन्य भरतीसाठी आवश्यक असलेली तयारी प्रभावीपणे होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या उपक्रमासाठी कॅप्टन दिलीप वाळके, कोरेकर मेजर तसेच रायचंद लाकूडझोडे मेजर हे आजीमाजी सैनिक विशेष परिश्रम घेत आहेत. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनामुळे हा प्रशिक्षण वर्ग गावातील तरुणांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरत आहे. या उपक्रमातून अधिकाधिक तरुणांनी प्रेरणा घ्यावी, शिस्त व कठोर परिश्रम अंगीकारावेत आणि पोलिस व सैन्य सेवेसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.


देशसेवा हीच खरी गावसेवा या भावनेतून सुरू झालेला हा उपक्रम उखलगावच्या तरुणांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे व विस्तार अधिकारी यादव यांनी या



उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राध्यापक संजय लाकूडझोडे यांचे ग्रामस्थांनी मनःपूर्वक आभार मानले.

# ट्रम्प यांची अरेरावी आता ग्रीनलँडवर डोळा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अमेरिकेने तेलासाठ्यासाठी व्हेनेझुएला या छोट्याशा देशावर अरेरावी करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करून त्यांना अटक केली आणि स्वतःला व्हेनेझुएला या देशाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर त्यांनी इराणमधील आंदोलनांना हवा देऊन तो देश अस्थिर करण्याचा डाव आखला इतकेच नाही तर इराणवर अमेरिका मोठा हल्ला करेल आणि इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी यांना पदच्युत करण्याची धमकी देऊन त्या देशावर अरेरावी केली. अमेरिकेच्या या अरेरावीचा



संपूर्ण जग निषेध करत असतानाच ट्रम्प यांची नजर अमेरिकेचा शेजारी असलेला ग्रीनलँड या छोट्या देशावर पडली आणि हा देश देखील आपल्या घशात घालण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आणि ग्रीनलँड हा अमेरिकेचाच एक भाग असून लवकरच ग्रीनलँड हे अमेरिकेतील नवे राज्य असेल अशी घोषणा केली. ग्रीनलँडने स्वतःहून अमेरिकेत विलीन व्हावे आणि जर ग्रीनलँड स्वतःहून अमेरिकेत विलीन झाला नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या देशाला अमेरिकेत विलीन करेल अशी धमकी दिली. इतकेच नाही तर जे देश ग्रीनलँडचे समर्थन करतील त्या देशांवर अमेरिका जबर आयात शुल्क अर्थात टेरिफ लावेल असा सज्जड दम देऊन त्यांना ब्लॅकमेल केले. ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या युरोपीय देशांना केलेले हे ब्लॅकमेलच आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेली विरुद्ध युरोपात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. ट्रम्प यांच्या या अरेरावी विरुद्ध डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन आणि इतर शहरात हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि ग्रीनलँड हा विकाऊ देश नाही अशा घोषणा दिल्या. इंग्लंड, फ्रान्स या देशांनी देखील ट्रम्प यांच्या या धोरणावर टीका केली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी ही अरेरावी थांबवावी असे निवेदन दिले आहे. केवळ युरोपच नव्हे तर संपूर्ण जग अमेरिकेच्या अरेरावी विरुद्ध एकजूट होत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिका खंडातही खदखद आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विस्तारवादी धोरणाविरुद्ध दक्षिण अमेरिका खंडातील देशातीलही मोठी नाराजी आहे. आज या देशांनी जाहीरपणे तसे बोलून दाखवले नसले तरी ते ही डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर नाराज आहेत. अमेरिकेतील नागरिकांनाही ट्रम्प यांचे हे विस्तारवादी धोरण मान्य नाही पण ट्रम्प आपली हेकेखोरी सोडायला तयार नाही. काहीही करून आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांना अमेरिकेत विलीन करून घ्यायचे, तेल संपन्न राष्ट्रांवर ताबा मिळवून तेथील तेलासाठे ताब्यात घ्यायचे तसेच जे आपले ऐकणार नाही त्यांच्यावर जबर आयात शुल्क अर्थात टेरीफ लावून त्यांना ब्लॅकमेल करायचे आणि संपूर्ण जगावर आपली एकहाती हुकूमत गाजवायची हे ट्रम्प यांचे धोरण आहे आणि ट्रम्प यांचे हेच विस्तारवादी धोरण जगाला युद्धाच्या खाईत घेऊन जाईल हे मात्र नक्की.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# श्रीरामपूरला दहा वर्षानंतर विषय समित्या

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

तत्कलीन लोकनियुक्त नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांचे ५ वर्ष आणि प्रशासकीय राजवटीचे ५ वर्ष असे तब्बल दहा वर्षानंतर श्रीरामपूर नगरपालिकेत विषय समित्या चार्ज झाल्या आहेत.

तत्कालीन नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांनी त्यांच्या कार्यकाळात सुमारे पाच वर्ष विविध समित्या गठित केल्या नाहीत. यावरून अनेक आरोप प्रत्यारोप ही झालेत. तदनंतर येथे प्रशासक राजवट आली. या काळात या समित्या अस्तित्वात नव्हत्या. आदिक यांच्या काळात समित्या न झाल्याने अनेकांच्या आनंदावर विर्जन पडले होते. श्रीरामपूर नगरपालिकेत आदिक यांच्या कार्यकाळात विषय समित्या व्हाव्यात, अशी अनेकांची मागणी होती. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने वारंवार निर्देशही दिलेत तरीही या समित्या बनविण्यात आल्या नव्हत्या. प्रशासक राजवटीत मात्र नागरिकांना नको तो त्रास सहन करावा लागला. प्रशासकांना विचारणारा कोणी नसल्याने या पालिकेत सर्वत्र हम करेसो कायदा निर्माण झाला होता. यामुळे शहरातील तमाम नागरिक जर्जर झाला होता. अस्वच्छता, खड्ड्यांचे रस्ते, दुर्गंधी तसेच घानीचे पाणी अशा एक ना अनेक समस्यांच्या तक्रारीचा या पालिकेत प्रशासकीय राजवटीत सदोदित पाऊस पडत होता. एकदा कधी नगर पालिकेच्या निवडणुका होतात आणि प्रशासक राजवट जाऊन नगरसेवक आणि नगराध्यक्ष हे नागरिकांच्या समस्या जाणून घेतात असे या ठिकाणी झाले होते. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी विषय समित्या बनवून कायद्याचा मान आणि नगरसेवकांना काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रशासकीय राजवटीत नागरिकांच्या आवाजाला कुणीच दाद देत नव्हता यामुळे नागरिक जाम वैतागले होते. सध्या सर्वसामान्य जनतेच्या हक्काचे नगरसेवक या ठिकाणी आता उपलब्ध झाल्याने प्रश्नांचा दररोज निपटारा होत आहे.




# समाजाला कायद्याची नव्हे, तर आत्मजागृतीची गरज– पो. नि. पुजारी

**पाथर्डी । नितीन गटाणी**

मी पोलीस अधिकारी आहे, पण त्याआधी मी एक माणूस आहे. जेव्हा माणूस आतून शांत होतो, तेव्हाच तो न्याय्य आणि संवेदनशील निर्णय घेऊ शकतो. समाजाला अधिक कायद्याची नव्हे, तर अधिक आत्मजागृतीची गरज आहे. कायदा भीती निर्माण करतो, अध्यात्म बोध निर्माण करते, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले. शहरातील विजयनगर येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात झालेल्या निरंकारी सत्संग कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या सत्संगाचे वैशिष्ट्य म्हणजे ५० नवीन जिज्ञासूंनी ब्रह्मज्ञान स्वीकारून आत्मज्ञानाच्या मार्गावर प्रवेश केला. लंगर व्यवस्थेची जबाबदारी केसभट नाना व मेहेत्रे यांनी पार पाडली.

अरुण यादव व सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी पोलीस निरीक्षक विलास पुजारी म्हणाले, आज माणूस सर्व काही मिळवत आहे, पण स्वतःला हरवत चालला आहे. सुविधा आहेत, अधिकार आहेत, पण अंतःकरणात शांतता नाही. आपण शरीरासाठी जगतो, पण आत्म्यासाठी जगायला विसरलो आहोत. आत्मा उपाशी राहिला की माणूस अस्वस्थ होतो आणि हीच अस्वस्थता पुढे राग, हिंसा आणि गुन्ह्यांचे रूप धारण करते. शरीर नश्वर आहे, हे आपण मान्य करतो, पण त्या जाणिवेने जगतो का याचा विचार प्रत्येकाने करायला हवा.




**सांगली येथील सांगलवाडी परिसरात सुमारे ३५० एकराच्या भव्य मैदानावर २४, २५ व २६ जानेवारी २०२६ रोजी ५९ व्या महाराष्ट्र वार्षिक निरंकारी संत समागमाचा ऐतिहासिक कार्यक्रम होणार आहे. सत्याचा बोध, आत्मचिंतन आणि विश्वामध्ये प्रेम, बंधुत्व, शांती व सौहार्द निर्माण करणे हा त्यामागील मूलभूत उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.**

आत्मा अमर व शाश्वत आहे. आत्म्याची ओळख झाली नाही, तर आयुष्य केवळ श्वासांची मोजदाद ठरते. ब्रह्मज्ञान म्हणजे ब्रह्माची प्राप्ती व भ्रमाची समाप्ती होते. म्हणजेच मृत्यूपूर्वी व मृत्युनंतर इहलोक व परलोक सुखी करण्याची व सुखी जीवन जगण्याची कला शिकवणारे ज्ञान आहे.

यावेळी प्रवचनात अशोक राऊत यांनी सांगितले की, भगवान शंकरांनी माता पार्वतीला दिलेले ब्रह्मज्ञान मछिंद्रनाथांनी ऐकले आणि तेच शाश्वत ज्ञान आज निरंकारी मिशन मानवतेपर्यंत पोहोचवत आहे. हा सत्संग केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता मानवतेला जागवणारा, आत्म्याला प्रकाश देणारा आणि समाजाला दिशा देणारा आध्यात्मिक महोत्सव ठरल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल खाडे यांनी केले तर ज्ञानप्रचारक राजकुमार माटा यांनी नवदीक्षित महात्म्यांना ब्रह्मज्ञान प्रदान केले. संजय लांडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# पाथर्डी नगरपालिकेतील विषय समिती निवड बिनविरोध

## स्थायी समिती अध्यक्षपदी अभय आव्हाड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

नगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदी अभय आव्हाड, पाणीपुरवठा समिती अध्यक्षपदी मंगल कोकाटे, बांधकाम समिती सभापतीपदी नंदकुमार शेळके, आरोग्य व शिक्षण समिती सभापतीपदी बंडु बोरुडे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी वंदना टेके यांच्या बिनविरोध निवडी सोमवारी करण्यात आल्या. प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वरील सर्व समित्यांच्या अध्यक्षपदासाठी एक-एकच अर्ज दाखल झाल्याने निवडी बिनविरोध पार पडल्या. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षातून भाजपात आलेल्या वंदना टेके यांना महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद मिळाले आहे. निवडीनंतर आमदार मोनिका राजळे यांनी सर्व सभापतींना त्यांच्या खुर्चीवर सन्मानपूर्वक बसवित त्यांचा सत्कार केला. पाचही सभापतींनी त्यांच्या कामाचा कार्यभार तात्काळ स्वीकारला. मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी सुभाष बोरुडे, अमोल गर्जे, अजय भंडारी, प्रतिक नांगरे, मनीषा उदमले, मंगल सोनटक्के, रेखा हंडाळ, देवा पवार, डॉ. जगदिश मुने, ज्योती पवार, किरण खेडकर, वर्षा मोरे, बजरंग घोडके, संजय देशमुख, डॉ. शारदा गर्जे उपस्थित होते. स्वीकृत नगरसेवक संजय भागवत व राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नगरसेविका सविता भापकर अनुपस्थित होते.

# देवगड–गहिनीनाथ गड बस सेवा सुरू करा; आ. मोनिका राजळे यांची मागणी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

श्री क्षेत्र देवगड ते श्री क्षेत्र गहिनीनाथ गड या दरम्यान महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची (एस.टी.) नियमित बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी शेवगाव-पाथर्डीच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे यांनी लेखी निवेदनाद्वारे विभाग नियंत्रक, अहिल्यानगर यांच्याकडे केली आहे. श्री क्षेत्र देवगड (ता. नेवासा) व श्री क्षेत्र गहिनीनाथ गड (ता. पाथर्डी, जि. बीड) ही दोन्ही ठिकाणे धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असून येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य यात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रोत्सवाला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सध्या श्री क्षेत्र देवगड सलबतपूर दहिगावणे भातकुडगाव फाटा शेवगाव पाथर्डी मोहटा चिंचपूर या मार्गावरून श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे जाण्यासाठी थेट बस सेवा उपलब्ध नसल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता श्री क्षेत्र देवगड (ता. नेवासा) ते श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, तसेच चिंचोली (ता. पाटोदा, जि. बीड) या मार्गावर तात्काळ बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी शिफारस निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# नॅशनल स्केटिंग स्पर्धेत झळकले टीम एक्स्ट्रीमचे तारे

**पुणे । रयत समाचार**

येथे रूरल गेम्स ऑफ इंडिया (RGOI) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १३व्या नॅशनल रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत नवी मुंबईच्या टीम एक्स्ट्रीमच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी टीम एक्स्ट्रीमच्या खेळाडूंनी तब्बल ६ पदकांची कमाई करत महाराष्ट्राच्या पदकतालिकेत मोलाची भर घातली. ही प्रतिष्ठेची राष्ट्रीय स्पर्धा १७ व १८ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथील एलएक्सटी राहुल राणे स्केटिंग बँड ट्रॅकवर पार पडली. देशभरातील १२ राज्यांमधील ६६८ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून ५ ते १६ वर्षे वयोगटातील खेळाडूंमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. नवी मुंबईच्या टीम एक्स्ट्रीमकडून अनन्या माळी २ रौप्य पदके, स्वरूप सोनवणे १ रौप्य व १ कांस्य पदक, पृथ्वी भावना राजेश २ कांस्य पदके पटकाविण्यात आली. अशी उल्लेखनीय कामगिरी नोंदवण्यात आली. सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर या खेळाडूंनी महाराष्ट्रासाठी गौरवशाली यश संपादन केले. या सर्व खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व प्रशिक्षक करण सरदार यांचे सक्षम मार्गदर्शन लाभले. स्वतः राष्ट्रीय पातळीवर यश मिळवलेल्या करण सरदार यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबईतील टीम एक्स्ट्रीम स्केटिंग क्लबमध्ये सध्या १०० हून अधिक खेळाडू नियमित प्रशिक्षण घेत आहेत. आधुनिक प्रशिक्षण पद्धती, तांत्रिक कौशल्य, शारीरिक क्षमता आणि मानसिक तयारी यावर विशेष भर दिला जात आहे. रोलर स्पीड स्केटिंग हा वेग, अचूकता आणि सहनशक्ती यांचा कस पाहणारा खेळ असून २०० मीटर ट्रॅक, मास स्टार्ट रेस, वेलोड्रोमसदृश वळणदार भिंती आणि फोटो फिनिशसारख्या अटींमुळे स्पर्धेची तीव्रता अधिक वाढते. अशा आव्हानात्मक परिस्थितीत टीम एक्स्ट्रीमच्या खेळाडूंनी दिलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्याने सर्वाधिक पदकांची कमाई करत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य म्हणून प्रथम क्रमांक पटकावला. महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या ३२२ खेळाडूंनी विविध गटांत पदके जिंकून राज्याला विजयी ट्रॉफी मिळवून दिली. उत्तर प्रदेशने दुसरा तर दिल्लीने तिसरा क्रमांक पटकावला. भविष्यातही महाराष्ट्रासाठी अधिकाधिक पदके जिंकण्याचा निर्धार टीम एक्स्ट्रीमने यावेळी व्यक्त केला. तसेच महाराष्ट्रात रोलर स्केटिंग या खेळाचा प्रसार वाढवून अधिकाधिक गुणवंत खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडवण्याच्या दिशेने टीम एक्स्ट्रीम स्केटिंग क्लब सातत्याने कार्यरत आहे.




आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आपली उणीव भासेल.!



मा सभागृह नेता विनीत नाथ पाऊलबुधे यांच्या आई
श्रीमती गिता नाथ पाऊलबुधे
शुक्रवार दि.१६/०१/२०२६
दशक्रिया विधी
रविवार दि.२५ जानेवारी २०२६, सकाळी ८ वा.
स्थळ – अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर
- दुःखांकित -
पाऊलबुधे परिवार, अहिल्यानगर, दहीगावने, जगधने परिवार, श्रीरामपूर
प्रवचन- ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे (राहुरी)